# बालशिक्षण पूर्व तयारी (२०१७ शासननिर्णय प्रक्रिया)

प्राथमिक शाळेतील पहिलीच्या उंबरठ्यावर उभा राहिलेला मुलगा कसा असायला हवा? त्याची बौद्धिक तयारी काय असावी? पहिलीपासून सुरू होत असलेले 'औपचारिक' शिक्षण, म्हणजे गणन, लेखन, वाचन यांचे शिक्षण दर्जेदार होण्यासाठी या उंबरठ्यावर उभ्या राहणाऱ्या मुलांची पूर्वतयारी काय असावी, याविषयी बरेच संभ्रम समाजात आणि शासनात आहेत असे दिसून येते. शालेयपूर्व शिक्षणाची तयारी करून घेणाऱ्या अंगणवाड्या आणि शालेय शिक्षण करणाऱ्या प्राथमिक शाळा यांची सांगड घालण्याचा एक प्रयत्न, २५ जुलै २०१७च्या महाराष्ट्र शासन निर्णयाने करावयाचे ठरविले आहे.

या शासननिर्णयाच्या प्रस्तावनेत एक समस्या मांडली आहे. ती अशी की, "सहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर पहिल्या वर्गात शाळेत प्रवेश घेण्यासाठी, अंगणवाडी केंद्रांतील मुले शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण झाल्याचे बऱ्याचवेळा दिसून येत नाही". शासनाचे हे निरीक्षण खरे आहे. शासनाने, येथे, 'शिक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण' या संकल्पनेचे स्पष्टीकरण दिले नाही. ते दिले पाहिजे. अन्यथा याचा अत्यंत अवाजवी व अशास्त्रीय अर्थ लावला जाईल. आणि संबंधित मंडळी अंगणवाडीत पहिल्या इयत्तेचा अभ्यासक्रम आणून अंतिमतः मुलांचे नुकसानच करतील. ही अशी भीती वाटते आहे, कारण सरकारने कार्यपध्दती व उपाययोजना निश्चित करताना, जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा उपयोग करण्याचे ठरविले आहे. प्राथमिक शिक्षक हे औपचारिक गणन-वाचन-लेखन शिकविण्यात तरबेज असतील, पण त्यांच्या कोणत्याही शिक्षणात किंवा अनुभवांत शास्त्रीय बालशिक्षण म्हणजे काय व ते कसे असते, याचा मागमूसही नसतो. साहजिकच ही मंडळी, शालेयपूर्व बालशिक्षणात (पूर्व बालशिक्षण नव्हे!) उतरवणे योग्य ठरणार नाही. तसे उतरविण्यासाठी त्यांना शास्त्रीय बालशिक्षणाची संथा देण्याची गरज राहील. अन्यथा ते गणन-लेखन-वाचन यांचाच आग्रह, अंगणवाडी सेविकेकडून धरतील आणि पहिलीचा वर्गच अंगणवाडीत आणून ठेवण्याचा खटाटोप करतील; व याचेच अपेक्षित असे मार्गदर्शन अंगणवाडी सेविकेला करतील.

उपर्युक्त शासननिर्णयात आणखी दोन बाबींचा उल्लेख आहे. एक, अंगणवाडीतील मुलांना इंग्रजी भाषा परिचित व्हावी, आणि दोन, 'डिजिटल अंगणवाडी' तयार करावी.यापैकी, इंग्रजी भाषेचा परिचय मुलांना देण्याआधी, मराठी भाषेचा परिचय अधिक समृध्द पातळीवर नेण्याची गरज आहे, कारण, याच भाषेतून अंगणवाडीच्या मुलांना अंगणवाडीत आणि नंतर प्राथमिक शाळेत शिक्षण घ्यायचे आहे. मुले प्राथमिक शाळेत सर्वच विषयांच्या आकलनात, कमी-अधिक प्रमाणांत कमी पडत असतील तर त्याचे एक प्रमुख कारण आहे, ते म्हणजे मराठी भाषेची अपुरी तयारी घेऊन ही मुले पहिलीच्या उंबरठ्यावर उभी राहतात. मात्र, इंग्रजी भाषेचा परिचय व्हावा, असे वाटत असेल तर, 'परिचय' कसा व किती याची अगोदर निश्चिती करावी लागेल. एक काळजी मात्र काटेकोरपणे घ्यावी

लागेल, ती म्हणजे, कुठल्याही परिस्थितीत ए,बी,सी,डी.... शिकविणे, किंवा पहिलीतील इंग्रजीची क्रमिक पुस्तके अंगणवाडीत आणणे याला बंदी घातली पाहिजे.

‘भाषा येणे’ याचा एक नैसर्गिक क्रम असतो. तो म्हणजे, आधी भाषा ऐकून समजू लागते; मग बोलायला येते.याला भाषा ‘आत्मसात होणे’ असे म्हणतात. जी भाषा मुलांना थोडीफार तरी ऐकून समजते आणि बोलता येते, ती भाषा पुढे वाचन आणि लेखन या कौशल्यांकडे वळविणे उपयुक्त ठरते. त्यामुळे इंग्रजीचा परिचय अंगणवाडीत द्यायचा असेल तर मुलांना ऐकायचे आणि बोलायचे अनुभव काही प्रमाणात देणे इष्ट ठरेल. लेखन व वाचन मात्र टाळलेले चांगले.

अंगणवाडी ‘डिजिटल’ करणे म्हणजे नेमके काय करायचे याचे स्पष्टीकरण शासननिर्णयात नाही. वास्तविक तंत्रज्ञानाचे शिक्षणातील स्थान, हे नेहमीच दुय्यम स्वरूपाचे आणि गरजेपुरते पूरक स्वरूपाचे असे असते. जेथे औपचारिक शिक्षणच नाही अशा बालशिक्षणात किंवा अंगणवाड्यांमध्ये, त्याला पूरक असे तंत्रज्ञान आणायला वावच असत नाही. तरीही संगणकरूपी तंत्राचा परिचय द्यायचा असेल तर त्याचा उपयोग ‘टीव्ही’ म्हणून करायला हरकत नाही. मुलांना आवडतील, मजा वाटेल, हसायला मिळेल अशा फिल्मस् किंवा निसर्गाची-त्यातील प्राणी-पक्षी यांची ओळख होईल अशा गोष्टी, संगणकाच्या सहाय्याने मोठ्या पडद्यांवर दाखवणे योग्य ठरेल.

वास्तविक पाहता बालशिक्षणाचे, म्हणजे शालेयपूर्व (पूर्व प्राथमिक नव्हे!) शिक्षणाचे क्षेत्र हे प्राथमिक शिक्षणापेक्षा गुणात्मकदृष्ट्या, शिक्षणपद्धतींच्या दृष्टीने आणि उद्दिष्टांच्या दृष्टीने पूर्णतः भिन्न आहे. बालशिक्षणाचे एक स्वतंत्र, पण अत्यंत विकसित असे शास्त्र आहे. पण ते आजवर कधी अंगणवाड्यांतून उतरलेले नाही. ही आपली सामाजिक कमतरता आहे. अंगणवाड्यांतून घडून यायला हवे, असे शास्त्रोक्त बालशिक्षण हे पालकांपर्यंत पोचविण्याचा कधी प्रयत्नही आपण करू शकलेलो नाही; त्यामुळे, बालवाडीत-अंगणवाडीत मुलांना लेखन-वाचनाचे धडे दिले गेले पाहिजेत, असा पालकांचा आग्रह असतो आणि अनेक बालशाळा या आग्रहाला बळी पडतात व अंतिमतः मुलांच्या क्षमता अधुऱ्या ठेवण्यास कारणीभूत ठरतात.

अंगणवाडीच्या, म्हणजे तीन ते सहा या वयोगटातील शिक्षण हे नेहमीच, बालकांच्या नैसर्गिक स्वरूपाच्या क्षमतांच्या विकासाचे असते. या क्षमता जशा भाषाविकासाच्या असतात तशाच या अंगभूत अशा गणित-संकल्पनांच्याही असतात. काही क्षमता बालकांच्या शारीरिक विकासातून जशा येतात, तशाच त्या बालकांच्या भावनिक नियमनांतूनही येतात. सामाजिक ओळखीने जशा सामाजिक वर्तनाच्या क्षमता विकसित होतात, तशाच निसर्गाच्या ओळखींतून, निसर्गविषयक वर्तनाच्या क्षमताही विकसित होऊ शकतात. बालशिक्षणाचे क्षेत्र हे बालकांच्या निसर्गदत्त अशा क्षमतांच्या, सामाजिक अंगाने करावयाच्या विकासाचे क्षेत्र असते. बालशिक्षणात, अंगणवाड्यांमध्ये काहीही शिकवायचे नसते तर मुलांच्या क्षमताविकासास सहाय्य करावयाचे असते.

बालकांचा क्षमताविकास हा बालकांना, जन्मोत्तर मिळत जाणाऱ्या अनुभवांतून होत असतो. हे अनुभव लहान बालके, आपल्या ज्ञानेंद्रियाकरवी सहजपणे आत्मसात करीत जातात. परंतु, वेगाने, नेटकेपणाने क्षमताविकास साध्य होण्यासाठी लागणारे विविधांगी आणि समृध्द अनुभव हे प्रत्येक बालकाला आपल्या कौटुंबिक व परिसरातील वातावरणांतून प्राप्त होतीलच असे नाही. अनेक बालकांना अशा अनुभवांना, सामान्यतः वंचितच राहावे लागते. अशांसाठी तीन ते सहा या वयोगटांसाठी, अंगणवाडी, बालवाडी अशा संस्थात्मक यंत्रणा उपयोगी पडू शकतात. मात्र या शिक्षणकेंद्रांतून अनौपचारिक अनुभव देण्याचेच, पण योजनाबध्द असे काम व्हावे लागते. कोणत्याही प्रकारच्या आणि कोणत्याही स्तरावरच्या औपचारिक (म्हणजे गणन-वाचन-लेखन) अशा शिक्षणाची लुडबुड खपवून घेता कामा नये.

बालशिक्षणाचे वय आणि शिक्षण हे अनौपचारिक शिक्षणाचे आणि मूलतः क्षमताविकासाचे क्षेत्र असते. सहा वर्षांपर्यंत एकदा या क्षमता नीटपणे विकसित झाल्या तर पुढे त्यांच्या सहाय्याने, वयाच्या सहाव्या वयानंतर, मग, औपचारिक शिक्षणाचा घाट यशस्वीपणे घालता येतो. बालशाळांतून, अंगणवाड्यांतून, मुलांची अनौपचारिक समज कशी वाढेल, मेंदूच्या विकासातून त्यांच्या अंतर्ज्ञानाची कक्षा कशी रुंदावेल आणि बरोबरीच्या मुलांच्या संपर्कातून त्यांची भाववृत्ती कशी विकसेल, याचा विचार व्हावा लागतो. त्यासाठी उपक्रम साधने आणि साहित्य यांचा वापर करण्याचाच ‘अभ्यासक्रम’ येथे असतो. असा अभ्यासक्रम कसोशीने अंमलांत आणला तर, आपोआपच, मुलांचा क्षमताविकास पुरेसा होऊन, मुले, प्राथमिकचा अभ्यासक्रम लीलया, झेलू शकतात असा जगभरचा अनुभव आहे. शासनाचा ‘आकार’ अभ्यासक्रमाद्वारे हे सहज साध्य होऊ शकेल.

भाषा आणि गणित यांची उपजत क्षमता व उपजत समज बालकांना असते, ती शिकवावी लागत नाही असे अनेक संशोधनांचे सार आहे. आपण बालवर्गांमधून मुलांना केवळ विविध भाषानुभवांत आणि गणितानुभवांत गुंतवायचे व रमवायचे असते. मुले आपली आपण शिकत जातात.

चांगल्या शास्त्रीय बालवाड्या व अंगणवाड्या मुलांची बळकट अशी प्राथमिक तयारी करून देत असतातच. मग आणखी वेगळे काही करण्याची व मुलांना ताण देण्याची गरज राहत नाही. आधीचा क्षमताविकास हा नंतरचा औपचारिक शिक्षणाच्या तयारीचा पाया आहे.

आपल्याला, न्याय्यतेच्या दृष्टीने, समतेच्या दृष्टीने आणि प्रत्येक बालकाच्या विकासाच्या दृष्टीने अंगणवाड्या संपन्न होण्याची गरज मात्र आहे, आणि उपर्युक्त शासननिर्णयात त्यावर नेमके बोट ठेवले आहे. यासाठी महाराष्ट्र शासन अभिनंदनास पात्र आहे.

❖